# माझ्या गावात आग लागली: समाज प्रश्नांकडे बघण्याची एक दृष्टी

माझ्या गावात आग लागली. गावाचा जवळजवळ एक चतुर्थांश भाग आगीत जळत होता. आकाशाला भिडण्यासाठी आगीच्या ज्वाळांमध्ये स्पर्धा सुरु होती. चालून आलेली संधी न दवडता वारा ज्वाळांना अधिकाधिक चिडवत–भडकवत होता. परिणामी आग वेगाने गावात पसरत होती.

ज्यांची घरे आगीपासनं सुरक्षित होती ती माणसं आपापल्या परीने आग विझवण्याचा प्रयत्न करत होती. ते प्रयत्न त्यांच्या त्यांच्या घरापर्यंत मर्यादित असल्यामुळे गावातली आग विझत नव्हती. आजूबाजूच्या घरातली–गावातली आग विझल्याखेरीज आपल्या घरातली आग विझणे शक्य नाही हे त्या लोकांना कळत नव्हतं. प्रत्येकजण आपापलं घर वाचवण्यात मश्गूल दिसत होता.

ज्यांची घरे आगीपासनं सुरक्षित होती ती माणसं प्रेक्षक बनून समोरची दृश्ये बघत होती. बघ्यांची ती गर्दी मोठ्या संख्येत तिथे उपस्थित होती. त्यांनी मनात आणले असते तर एकत्र मिळून थोड्याच कालावधीत गावातली आग आटोक्यात आणली असती. पण त्यांनी तसलं काही केलं नाही. कारण त्यांची घरे आगीच्या लपेटीत नव्हती. म्हणजे गावातली आग हा त्यांचा प्रश्न नव्हता. तो प्रश्न गावाचा होता. म्हणून त्यांना प्रेक्षक बनण्यात अधिक स्वारस्य होतं आणि ते तसं सोप्पं काम होतं.

या गदारोळात मी कुठे होतो?

आग लागल्यानंतरचा सुरुवातीचा काही काळ मी बघ्यांच्या गर्दीत सामील होतो. प्रेक्षकाच्या भूमिकेत वावरत होतो. अचानक माझ्या आतमध्ये काहीतरी गडबड झाली. कसला तरी विचार डोक्यात सर्रकन सरकून गेला. मला जास्त वेळ प्रेक्षकाची भूमिका वठवणं शक्य झालं नाही आणि मी पूर्ण ताकदीनीशी गावातली आग विझवण्याच्या कामास लागलो. मोठ्या संख्येने तिथे जमलेल्या प्रेक्षकांच्या गर्दीला हा आश्चर्याचा धक्कआ होता. जोखीम पत्करुन गावातली आग विझवण्याचा मी प्रयत्न करणं हे त्यांना अनपेक्षित होतं. कारण त्यांच्या दृष्टीने माझं घर आगीपासनं दूर सुरक्षित होतं मग ही नसती उठाठेव मी कशासाठी–कुणासाठी करतोय अशी कुजबुज प्रेक्षकांच्या गर्दीत सुरु झाली. पण त्याकडे लक्ष द्यायला मला वेळ कुठे होता. माझ्या दृष्टीने गावातली आग विझवणे महत्त्वाचे होते.

आग विझवण्याच्या प्रयत्नात माझ्या अंगाला चटके बसत होते. सुरुवातीला चटक्यांचा त्रास होत होता. थोड्या वेळाने मात्र चटक्यांची सवयच झाली. ऊलट त्यात वेगळीच मजा वाटू लागली (जी यापूर्वी मी कधीही अनुभवली नव्हती). क्षणात एक विचार मनाला स्पर्शून गेला –
'अरेच्चा! चटके खाण्यातही एक वेगळी मजा असते हे आजपर्यंत आपल्याला माहीतच नव्हते.'

गावातली आग विझवण्यासाठी माझे एकट्याचे प्रयत्न अपूरे पडत होते. तरीही मी मागे हटलो नाही. स्वत:ला पूर्णपणे झोकून देत बेभान होवून आग विझवण्यासाठी शक्य ते सर्व करत होतो. कदाचित त्यामुळेच कधी काळी मला अशक्य वाटणाऱ्या काही गोष्टी माझ्या हातून घडून गेल्या. तसा चटकन एक विचार मनाला स्पर्शून गेला –
'च्यायला! आपल्यात एवढी तकत आहे हे माहीतच नव्हतं. आपण हे पुर्वी करू शकतो असं कधी वाटलचं नव्हतं.'

माझे प्रयत्न निरंतर सुरूच होते. थोड्या वेळाने प्रेक्षकांच्या गर्दीत काहीतरी गडबड झाली आणि काही माणसं आग विझवण्याचा कामात माझ्या मदतीला धावून आली. हे पाहून माझ्या अंगात उत्साह संचारला. बळ वाढल्यालत वाटलं आणि आम्ही सगळे जोमाने आग विझवण्याच्या कामास लागलो. हळूहळू गर्दीतले प्रेक्षक कमी कमी होत लोक आमच्या मदतीला आले. मग काय,
'लोग साथ आते गए और कारवा बनता गया'.

मग मात्र आग विझवायला फारसा वेळ लागला नाही. आमचं गाव आम्ही वाचवलं. गावाचा आनंद गगनात मावेनासा झाला. सगळीकडे लोकांचा जल्लोष सुरू होता. गावात सगळीकडे आनंदोत्सव साजरा केला जात होता.

त्या क्षणी माझी अवस्था काय होती?

आग विझवण्याच्या प्रयत्नात शरीराला बऱ्याच ठिकाणी भाजलं होतं. तीव्र वेदना जानवत होत्या. शरीरातलं त्राण कमी कमी होत होतं. मध्येच केव्हातरी शुध्द हरपली.

शुध्दीवर आलो तेव्हा मी दवाखान्यात ॲडमिट होतो. आता जरा बरं वाटत होतं. दवाखान्यात कानावर येणाऱ्या बातम्यांनी माझी खुप करमणूक होत होती. स्थानिक वर्तमानपत्रातनं माझ्यावर स्तुतीसुमने उधळली जात होती. न्युजचॅनल्सवाली मंडळी 'गावातली आग आणि माझे प्रयत्न' अशी स्टोरी मीठमसाला लावून कव्हर करत होते. थोर समाजसेवकांना दिला जाणारा स्थानिक पातळीवरचा पुरस्कार मला परस्पर जाहीर करण्यात आला.

आठवडाभरात तंदुरूस्त होऊन मी घरी परतलो. दुसऱ्याच दिवशी गावात मोठी सभा भरवण्यात आली. सभेला आख्खा गाव जमलेला होता. गावातले पुढारी, ज्येष्ठ व्यक्ती, स्थानिक राजकारणी, पत्रकार मंडळी आदि लवाजमा सभेला उपथित होता. (ह्या मंडळींचा गावात आग लागलेली असतांना कुठेच पत्ता नव्हता.) सभेला सुरूवात झाली. ठरल्याप्रमाणे उपरोक्त मंडळींची कंटाळवाणी भाषणे झाली. मला पुरस्कार प्रदान करण्यात आला. टाळ्यांचा गजर झाला आणि मला काहीतरी बोलण्याचा आग्रह करण्यात आला. माझं घर आगीपासनं दूर सुरक्षित असतांना स्वत:चा जीव धोक्यात घालत गावातली आग विझवण्याचे जोखमीचे काम मी का पत्करले हे ऐकण्यासाठी सगळा गाव आतूर होता. मी बोलायला सुरवात केली –

"माझे घर वाचवण्यासाठी. स्वत:चा जीव धोक्यात घालत गावाला लागलेली आग विझवायला मी धावून गेलो कारण मला माझं घर वाचवायचं होतं. त्याक्षणी मला स्पष्टपणे कळलं होतं, जर ही आग मी आता रोखली नाही तर आज न उद्या ती माझंही घर गिळंकृत करेल. आगीत जळणारं माझं घर मी उघड्या डोळ्यांनी शांत बसून पाहूच शकत नाही. तशी कल्पनाही मला करवत नाही. माझ्या घरावर माझं नितांत प्रेम आहे. कारण माझा सगळा स्वार्थ त्या घरात दडलेला आहे आणि मला माझा स्वार्थ खूप प्रिय आहे.

गावातली आग विझवण्याच्या कामात मी पुढाकार घेतला याबाबतीत मी एवढचं म्हणेन की मी माझ्या स्वार्थाप्रती थोडा जास्त जागरुक होतो. असं जर सगळ्यांच्या बाबतीत झालं असतं तर कदाचित गावाचं झालं नुकसानही टाळता आलं असतं. असो!

मिळालेल्या पुरस्काराच्या बाबतीत माझी प्रतिक्रिया विचाराल तर मला आवर्जून सांगावसं वाटतं की गावातली आग विझवण्यासाठी स्वत:ला झोकून देत बेभान होऊन काम करतांना जे आत्मभान आलं – आत्मशक्तीचे जे दर्शन झालं, स्वत्वाची जी जाणीव मनात आकारास आली, ती माझ्यासाठी सगळ्यात मोलाची मिळकत आहे. त्यातच माझा खरा आनंद दडलेला आहे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे गावातली आग विझवण्याच्या प्रयत्नात मला एक साक्षात्कार झाला– माझं घर वाचवण्यासाठी माझे एकव्याचे प्रयत्न अपूरे आहेत. मी एकटा माझं जळतं घर वाचवण्यासाठी असमर्थ आहे.

त्यासाठी मला तुम्हा सगळ्यांच्या मदतीची – सोबतीची – सहकार्याची – मार्गदर्शनाची – शुभेच्छांची – प्रेमाची नितांत गरज आहे. माझं घर वाचवण्यासाठी तुम्ही सगळे माझ्या सोबतीला याल का?

शेवट करतांना मला सगळ्यांना पुन्हा पुन्हा सांगायलाच पाहिजे – मी थोर समाजसेवक वगेरे नाहीये हो!

मला माझं घर वाचवायचं होतं म्हणुन........"

*****************************************************************

ग्लोबल वॉर्मिंग, दहशतवाद, नक्षलवाद, वाढती विषमता, बेरोजगारी, गरीबी, धार्मिक मूलतत्ववाद, जातीयता, चंगळवाद, इत्यादी आगी आपल्या घरांच्या आसपास, गावात लागलेल्या आहेत. या आगी विशिष्ट स्थळ – काळापुरत्या मर्यादित न राहता प्रचंड वेगाने वणव्यासारख्या सर्वत्र पसरत आहेत. या 'आगी आणि माझा व्यक्तिगत स्वार्थ' यातला परस्परसंबंध आपल्या संकुचित दृष्टीला दिसतचं नाहीये.

म्हणुनच व्यक्तिगत स्वार्थाप्रती जास्त जागरुक – सजग असलेल्या नागरिकांनी, युवांनी या आगी विझवण्याच्या कामात पुढाकार घ्यायला हवा असा 'स्वांत:सुखाय' विचार प्रस्तुत गोष्टीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी –

'व्यक्तिगत स्वार्थ नेहमीच कृतीतनं प्रकट होतो.
मानवी संवेदनशीलतेच्या बाबतीत तसं होईलच असं नाही.'

गोपाल सुभाष महाजन
निर्माण फेलो,
सर्च, गडचिरोली
mahagopsu@gmail.com